# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे–०४
## कोविड–१९ विषाणूच्या प्रादूर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोजित
## माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च–एप्रिल २०२२
# मुख्याध्यापकांसाठी विशेष मार्गदर्शक सूचना
## प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन, इ.

१. अ) कोविड–१९ विषाणूच्या प्रादूर्भावाच्या पार्श्वभूमीवर बहुतांश माध्यमिक शाळा विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह सुरु ठेवण्यास कमी कालावधी मिळाल्याने प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन इ. परीक्षेसाठी मंडळामार्फत स्वतंत्र सूचना व कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. ती विचारात घेवून सदर परीक्षा दिनांक २५/०२/२०२२ ते दिनांक १४/०३/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात याव्यात. प्रयोग वही (जर्नल) व अनुषंगिक लेखन कार्य/ प्रकल्प उपरोक्त कालावधीत जमा करुन घेण्यात यावेत.

**महत्वाचे**–मंडळाने उपरोक्तप्रमाणे निर्धारित केलेल्या कालावधीत विद्यार्थी कोरोनाबाधित झाल्यामुळे अथवा अन्य वैद्यकीय/अपरिहार्य कारणांमुळे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन इ. परीक्षा देवू न शकल्यास अशा विद्यार्थ्यांची सदर परीक्षा लेखी परीक्षेनंतर दिनांक ०५/०४/२०२२ ते दिनांक २२/०४/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात यावी. Out of Turn चा कालावधी उपरोक्त कालावधीतच समाविष्ट असेल, त्यामुळे Out of Turn साठी स्वतंत्र कालावधी देण्यात येणार नाही. यापूर्वी प्रयोग वही (जर्नल) व अनुषंगिक लेखन कार्य/प्रकल्प सादर न करु शकलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत या कालावधीत ते जमा करण्याची संधी देण्यात यावी.

ब) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेच्या श्रेणी, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन इ. परीक्षा घेण्याची जबाबदारी संबंधित माध्यमिक शाळांना देण्यात आलेली आहे. त्यामुळे श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन इ. परीक्षा प्रचलित मूल्यमापन आराखडयानुसार तसेच कोविड–१९ विषाणूच्या प्रादूर्भावाची परिस्थिती विचारात घेऊन निर्धारित कालावधीत पार पाडावी.

२. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस अंतर्गत मूल्यमापन असलेल्या सर्व विषयांच्या परीक्षेबाबत खालीलप्रमाणे नियोजन करण्यात आलेले आहे.

अ) कोविड–१९ विषाणूची पार्श्वभूमी विचारात घेऊन विषयनिहाय प्रात्यक्षिकांची संख्या ४०% करण्यात आलेली आहे.

ब) या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अंतर्गत व बहिस्थ परीक्षक संबंधित माध्यमिक शाळेतूनच घेण्यात यावेत. ज्या शाळेत एका विषयासाठी एकापेक्षा अधिक विषय शिक्षक उपलब्ध नाहीत तेथे त्याच उपलब्ध विषय शिक्षकाकडून अंतर्गत व बहिस्थ परीक्षकाचे काम करुन घ्यावे.

३. माध्यमिक शाळेतील सर्व संबंधितांनी कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या अनुषंगाने शासनाच्या व आरोग्य विभागाच्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

४. उपरोक्त कालावधीत माध्यमिक शाळेत पिण्याच्या पाण्याची व सॅनिटायझरची व्यवस्था करण्यात यावी. याशिवाय, अधिक सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी शाळेत येताना स्वतःची पाण्याची बाटली व सॅनिटायझर सोबत ठेवण्याबाबत तसेच मास्क व लेखन साहित्य (उदा-पेन, पेन्सिल, कंपास इ.) सुद्धा स्वतःसोबत आणण्याबाबत परीक्षार्थ्यांना सूचित करावे.

५.प्रात्यक्षिक परीक्षा आयोजित करताना कोविड-१९ च्या प्रादूर्भावासंदर्भातील सूचनांचे पालन करण्याच्या दृष्टिने उपलब्ध जागेचा विचार करून विद्यार्थ्यांच्या बॅचेस तयार कराव्यात.

६.विद्यार्थ्यांना व अन्य घटकांना शाळेत प्रवेश देताना त्यांचे तापमान मोजण्यात यावे तसेच शाळेतील संपूर्ण कालावधीत विद्यार्थी व सर्व संबंधितांनी मास्क वापरणे अनिवार्य राहील.

७.शाळेमध्ये कोणत्याही प्रकारे गर्दी होणार नाही व शारीरिक अंतर राखले जाईल याची दक्षता घ्यावी. आरोग्यविषयक सर्व सूचनांचे पालन करावे.

८.प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी परीक्षा दालनात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य ती काळजी घ्यावी.

९.शाळेच्या आवारातील कचरा कुंडया झाकून ठेवाव्यात.

१०.स्वच्छतागृहे वेळोवेळी निर्जतुकीकरण करुन घ्यावीत.

११.प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन इ. परीक्षेच्या कालावधीत शाळेच्या आवारामध्ये बाहय घटकांना प्रवेश देण्यात येवू नये.

१२.प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन इ. परीक्षेच्या कालावधीत शाळेच्या आवाराबाहेर बाहय व असंबंधित घटकांनी गर्दी करु नये यासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी.

१३.कोविड-१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचा परीक्षेचा ताण-तणाव कमी करण्याच्या अनुषंगाने विद्यार्थी, पालक व संबंधित घटक यांच्या शंकांचे निरसन व मार्गदर्शन करण्यासाठी राज्यमंडळ व विभागीय मंडळ स्तरावर स्वतंत्रपणे नियंत्रण कक्ष/हेल्पलाईन उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच राज्यमंडळ व विभागीय मंडळ स्तरावर समुपदेशकही नेमण्यात आलेले आहेत. सदर बाब संबंधित घटकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

---------------------- **** ----------------------